

# पुण्यात ३५ हजार महिलांचे सामूहिक अथर्वशीर्ष पठण

**पुणे** : ओम नमस्ते गणपतये... मोरया, मोरया... आणि ओम गं गणपतये नमः च्या जयघोषाने ऋषीपंचमीनिमित्त आयोजित सोहळ्यात ऊर्जेने भारलेल्या वातावरणामध्ये हजारो महिलांच्या गर्दीचा उच्चांक पाहायला मिळाला.

तब्बल ३५ हजार पेक्षा जास्त महिलांनी एकत्र येत अथर्वशीर्ष पठणातून गणरायाला नमन केले. गणेश नामाचा जयघोष, अथर्वशीर्ष आणि महाआरतीने संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते.

निमित्त होते, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळच्या वतीने ट्रस्टच्या १३४ व्या वर्षीच्या गणेशोत्सवात उत्सव मंडपासमोर आयोजित अथर्वशीर्ष पठण सोहळ्याचे. यावेळी ऋषीपंचमीनिमित्त ३५ हजार महिलांचे अथर्वशीर्ष पठण गणेशोत्सवातील प्रेम मंदिराच्या प्रतिकृती समोर पार पडले.

पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, शुभांगी भालेराव, अर्चना भालेराव, सुवर्णयुग तरुण मंडळाचे सौरभ रायकर, यतिश रासने, मंगेश सूर्यवंशी, राजाभाऊ घोडके, सचिन आखाडे, अंकुश रासने यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. पारंपरिक वेशात मध्यरात्री २ वाजल्यापासून महिलांनी या उपक्रमाकरिता हजेरी लावण्यास सुरुवात केली. उपक्रमाचे ४१ वे वर्ष होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महिलांनी शंखनाद केल्यानंतर सोहळ्याला प्रारंभ झाला. त्यानंतर मन शांत करणारा ओंकार जप, गणराजा गणनायका...मोरया रे बाप्पा मोरया रे... या गणेशगीताच्या सादरीकरणाने वातावरण मंत्रमुग्ध झाले. महिलांनी अथर्वशीर्ष पठण करीत गणरायाला नमन केले. मोरया मोरया दगडूशेठ मोरया... असा गजर करताना महिलेच्या चेहऱ्यावरील उत्साह ओसंडून वाहत होता. दगडूशेठच्या उत्सव मंडपापासून ते नाना वाडयापर्यंतच्या परिसरात महिलांनी अथर्वशीर्ष पठणाकरिता गर्दी केली.

महापौर मंजुषा नागपुरे म्हणाल्या, उत्सवात महिला तयार होऊन येते किंवा उत्सवाची तयारी करते तेव्हाच तो उत्सव पूर्ण होतो.

महिला हात उंचावून टाळ्यांचा गजर करीत गणरायाला नमन करीत होत्या. मुंबई, सातारा, कोल्हापूर, लातूर शहरातून महिला या उपक्रमासाठी आल्या होत्या.

# गणेशोत्सवात पुण्यात भव्य सांस्कृतिक कार्यक्रम

आजपासून कार्यक्रमांची खास पर्वणी

**पुणे** : महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक गणेशोत्सवाला 'महाराष्ट्र राज्य महोत्सव' म्हणून घोषित केले असून, या निमित्ताने प्रथमच पुणे शहरात एका भव्य सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

१६ ते १८ सप्टेंबरदरम्यान ऐतिहासिक शनिवारवाडा येथे विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची खास पर्वणी आयोजित करण्यात आली आहे. राज्याच्या सांस्कृतिक संचालनालयाच्या माध्यमातून आयोजित या महोत्सवाचे संयोजन कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने करत आहेत. महोत्सवाचे उद्घाटन सिनेअभिनेते आणि दिग्दर्शक प्रवीण तरडे यांच्या हस्ते होणार आहे.

आमदार हेमंत रासने हे सार्वजनिक गणेशोत्सवातील सक्रिय कार्यकर्ते असून, कसबा मतदारसंघातून निवडून आल्यानंतर पहिल्याच अधिवेशनात त्यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला 'महाराष्ट्र राज्य महोत्सव' म्हणून घोषित करण्याची मागणी होती. गेल्या वर्षापासून सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून गणेशोत्सवाच्या काळात राज्यभर विविध सांस्कृतिक उपक्रम आयोजित केले जात आहेत.

शनिवारवाड्यावर तीन दिवस रंगणाऱ्या या सांस्कृतिक महोत्सवात विविध कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना मिळणार आहे. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी, म्हणजेच १६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ ते रात्री ९.३० या वेळेत पारंपरिक ढोल-ताशा पथकांचा 'नादविष्कार' हा कार्यक्रम रंगेल.

पुण्याच्या गणेशोत्सवाची ओळख असलेल्या समृद्ध ढोल-ताशा परंपरेचा अनुभव शनिवारवाड्याच्या ऐतिहासिक वास्तूत घेता येणार असून, पुण्यातील नामांकित पारंपरिक ढोल-ताशा पथकांकडून भव्य वादन सादर केले जाईल. यामध्ये ज्ञानप्रबोधनी, 'स्व'रूपवर्धिनी, तेजस्विनी (महिलांचे झांज पथक) आणि शिवमुद्रा ही पथके सहभागी होणार आहेत.

१७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ ते रात्री ९.३० या वेळेत 'कणक-अक्षर अक्षर तुझेच आहे' हे विशेष काव्य सादरीकरण आयोजित करण्यात आले आहे. त्यानंतर अंतिम दिवशी, १८ सप्टेंबर रोजी 'फोक लोक - महाराष्ट्राच्या लोककलेचा जल्लोष' हा विशेष कार्यक्रम होणार आहे.



## गणेशोत्सवामुळे संस्कृतीला मोठे व्यासपीठ

गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळणे ही संपूर्ण महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानाची बाब असल्याचे आमदार हेमंत रासने यांनी म्हटले आहे. पुण्याच्या सार्वजनिक गणेशोत्सवाला मोठी ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरा असून, या परंपरेला महाराष्ट्र राज्य महोत्सव म्हणून दर्जा मिळाल्यामुळे गणेशोत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्राची संस्कृती, लोककला आणि कलावंतांना एक अत्यंत व्यापक व्यासपीठ मिळाले आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



# अनुराधा मराठे यांचा संगीत साधनेबद्दल पुणे फेस्टिव्हलतर्फे सत्कार

**पुणे** : प्रख्यात मराठी सुगम संगीत गायिका अनुराधा मराठे यांच्या वयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त पुणे फेस्टिव्हलतर्फे त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते मंगळवारी पत्रकार भवन, नवी पेठ येथे हा सत्कार झाला. यावेळी पुणे फेस्टिव्हलचे जनरल सेक्रेटरी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई, मुख्य संयोजक ॲड. अभय छाजेड, नगरसेवक सुनील शिंदे, मोहन टिल्लू आदी उपस्थित होते. यानिमित्ताने ज्येष्ठ निवेदिका मंजिरी धामणकर यांनी अनुराधा मराठे यांच्या प्रदीर्घ संगीत प्रवासावर आधारित प्रकट मुलाखत घेतली.

कार्यक्रमाची सुरुवात तन्मयी मेहेंदळे-कुलकर्णी यांनी यमन रागातील गणेशस्तवनाने केली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल म्हणाले, ३८व्या पुणे फेस्टिव्हलची सुरुवात झाली आहे.

> गुरू, कुटुंब आणि दिग्गज संगीतकारांकडून मिळालेल्या संस्कारांमुळे आपली जडणघडण झाली. माझ्या आई-वडिलांना गायनाची आवड होती. वडिलांच्या राष्ट्र सेवा दलाच्या कार्यामुळे आम्ही धुळ्यात स्थायिक झालो.
> - अनुराधा मराठे, गायिका

अनुराधा मराठे यांचा सत्कार म्हणजे अखंड संगीतसाधनेचा सन्मान आहे. कलाकाराचा सन्मान हा केवळ त्या कलाकाराचा नसून संपूर्ण संगीत क्षेत्राचा सन्मान असतो. वय वाढते तसे कलाकाराची कला अनुभवातून अधिक समृद्ध होत जाते.

अनुराधा मराठे यांनी सांगितले की, वयाच्या सातव्या वर्षी डॉ. श्रीपाद नाईक यांच्याकडे पाच रुपये फी देऊन गायन शिकण्यास सुरुवात केली. मात्र, एका वर्षाने कुटुंबाच्या आग्रहामुळे गायन थांबले. त्यानंतर माझे गुरू स्वतः घरी आले आणि पुन्हा मला गायनासाठी घेऊन गेले. पुढे त्यांनी १७ वर्षे कोणतीही फी न घेता मला उत्तम प्रकाराचे प्रशिक्षण दिले.

गायनासोबत चित्रकला आणि नाटकाचीही आवड होती. मात्र, आईने ''नाटक लग्नानंतर करता येणार नाही; पण गायन करता येईल,'' असा सल्ला दिला. त्यामुळे गायनाची साधना सुरू ठेवली. गुरूंनी रियाजाचे महत्त्व मनावर बिंबवले. ''सहा तास सराव केला तरच तीन तास व्यवस्थित गाता येते,'' हा गुरूंचा मंत्र आयुष्यभर उपयोगी पडल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी बंदिश 'लाज शरम तो को नाही...' सादर केली. गुरूंनी गायनासोबत तबलाही शिकवला. सूर आणि ताल हे एकत्र असतात. मात्र, आजच्या संगीतात त्यांच्यातील हा समतोल वेगळा जाणवतो, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन आडेकर यांनी केले. आभार प्रदर्शन मंजिरी धामणकर यांनी केले.

# वक्फच्या ९६ हजार एकर जमिनींचा गैरव्यवहार

## वक्फ टास्क फोर्सचे राष्ट्रीय अध्यक्ष सलीम मुल्ला यांचा आरोप

**पुणे**ः महाराष्ट्रातील वक्फ बोर्डाच्या ९६ हजार एकर जमिनीच्या व्यवहारात प्रचंड अनियमितता आणि गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप वक्फ टास्क फोर्सचे राष्ट्रीय अध्यक्ष सलीम मुल्ला यांनी केला आहे. या संपूर्ण महाघोटाळ्याची कागदपत्रांच्या पुराव्यांसह सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत केली.

वक्फ जमिनी तसेच संबंधित मालमत्तांचे योग्य संरक्षण व्हावे आणि या मालमत्तांचा वापर समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी केला जावा, या उद्देशाने राज्य सरकारने २०१६ मध्ये वक्फ मंडळासंदर्भात एक विशेष अध्यादेश जारी केला होता. मात्र, प्रशासनाने या अध्यादेशाची कोणतीही अंमलबजावणी केली नाही, असा थेट आरोप सलीम मुल्ला यांनी केला. प्रशासनातील काही जबाबदार अधिकारी आणि संबंधित घटकांनी स्वतःच्या वैयक्तिक फायद्यासाठी या अध्यादेशाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून गैरव्यवहाराला खतपाणी घातल्याचा दावा त्यांनी केला आहे.

## पाच हजार पोलिसांचा बंदोबस्त

गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडावा, तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलिस प्रशासनाने व्यापक बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. जिल्ह्यातील ३५ पोलिस ठाण्यांतील विविध शाखांचे प्रभारी पोलिस निरीक्षक, सहायक पोलिस निरीक्षक, पोलिस उपनिरीक्षक तसेच पुरुष व महिला पोलिस अंमलदारांसह सुमारे ५ हजार अधिकारी-कर्मचारी बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले. १४ ते २६ सप्टेंबर या कालावधीत हा व्यापक पोलीस बंदोबस्त राहणार आहे.

# विवाहितेची मुलासह आत्महत्या

**जळगाव** : सोमवारी गणेशचतुर्थीला घरासह कॉलनीत गणपती स्थापनेची तयारी सुरू असतांना जळगाव शहरात एका विवाहितेने आपल्या चार वर्षाच्या मुलासह गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सायंकाळी उघडकीस आली.

शहरात तळेले कॉलनीत हेमांगी निखिल महाजन या रहात होत्या. सोमवारी गणपती स्थापनेची तयारी सुरू होती. महाजन कुटुंबीय गणपती स्थापनेच्या तयारीत होते. या दरम्यान हेमांगी महाजन आपल्या चार वर्षाच्या मुलासह खोलीत गेल्या. काही वेळाने गणपती स्थापनेसाठी त्यांना बोलावण्यात आले असता खोलीचा दरवाजा आतून बंद होता.आतून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने कुटुंबीयांनी पोलिसांना माहिती दिली.

# जळगाव महापालिकेच्या महापौरांच्या श्री गणेशाची प्रतिष्ठापना

**जळगाव** : विघ्नहर्ता, मंगलमूर्ती श्री गणरायाचे भक्तिमय वातावरणात जळगाव शहरासह जिल्हयात सोमवारी आगमन झाले.

गेले तीन दिवस, कोसळणारा पाऊस आज सकाळी थांबला होता. शहरात विविध शैक्षणिक संस्था, मंडळांच्या मिरवणुका निघालेल्या दिसत होत्या. सर्वत्र उत्साहाचे वातावरण होते जळगाव शहर महानगरपालिकेच्या मानाच्या श्री गणपतीची भव्य आगमन मिरवणूक सोमवारी सकाळी १० वाजता शिवतीर्थ मैदानापासून डीजेमुक्त वातावरणात काढण्यात आली होती.

मिरवणुकीत आमदार, महापौरांसह सर्व नगरसेवक, पालिका अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. जळगावचे आमदार सुरेश भोळे, महापौर दीपमाला काळे माजी नगरसेवक मनोज काळे आणि अतिरिक्त आयुक्त शोभा बाविस्कर यांच्या हस्ते श्री गणेशाचे पूजन करून श्री गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली. यांप्रसंगी आयुक्त आदित्य जीवने, उपमहापौर मनोज चौधरी, स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य महाआरती पार पडली.

## 'एक गाव, एक गणपती'ला नागरिकांचा चांगला प्रतिसाद

गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा वाढावा आणि अनावश्यक स्पर्धेला आळा बसावा, या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या 'एक गाव, एक गणपती' उपक्रमालाही जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळाला आहे. जिल्ह्यात तब्बल १७३ ठिकाणी 'एक गाव, एक गणपती' संकल्पना स्वीकारण्यात आली आहे.

# ॲड. वसंतराव साळुंखे यांना 'मराठवाडा भूषण'प्रदान



**छत्रपती संभाजीनगर** : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या मराठवाडा विभागीय कार्यालयात महाराष्ट्र राज्य बार कौन्सिलचे सदस्य ॲड. वसंतराव साळुंखे यांना आगामी 'मराठवाडा भूषण पुरस्कार सोहळा २०२६' चे सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी ॲड. वसंतराव साळुंखे यांच्या हस्ते विभागीय कार्यालयात श्री गणेशाची विधिवत स्थापना करण्यात आली. गणरायाच्या आगमनानिमित्त कार्यालयात उत्साहाचे वातावरण होते. पत्रकार संघाच्या विविध उपक्रमांसह आगामी 'मराठवाडा भूषण पुरस्कार सोहळ्या'च्या नियोजनाबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे मराठवाडा अध्यक्ष अनिल सावंत, जिल्हाध्यक्ष छबुराव ताके, विद्यापीठाचे माहिती अधिकारी संजय शिंदे, जिल्हा सचिव सुजित ताजने, जे. ई. बांबर्डे, संजय हिंगोलीकर, प्रशांत सूर्यतळे आणि रविंद्र लांडगे उपस्थित होते.


## शुद्धिपत्रक

ICICI Bank

शाखा कार्यालय: आयसीआयसीआय बँक लिमिटेड, कार्यालय क्रमांक २०१-बी, दुसरा मजला, रोड क्र. १, प्लॉट क्र. बी-३, वाय-फाय आयटी पार्क, वागळे औद्योगिक वसाहत, ठाणे(पश्चिम)- ४००६०४

मुंबई (ठाणे) आवृत्तीतील फ्री प्रेस (इंग्रजी) आणि नवशक्ती (मराठी) या वर्तमानपत्रांमध्ये १२ सप्टेंबर २०२६ रोजी प्रकाशित झालेल्या सांकेतिक ताबा सूचना या जाहिरातीचा संदर्भ घ्यावा. ही जाहिरात खालील कर्जदारांच्या नावाशी आणि क्रमांकांशी संबंधित आहे: १) सपना कुमार भट्ट LBMUM00005308854/ LBTNE00004874705 आणि २) सचिन काशीनाथ पवार- LBKLY00005373097). ताबा सूचनेमध्ये अनवधानाने झालेल्या चुकीमुळे, प्रत्यक्ष ताबा सूचना ऐवजी सांकेतिक ताबा सूचना असा उल्लेख झाला होता. तरी, कृपया सदर सूचनेचा अर्थ प्रत्यक्ष ताबा सूचना असाच घ्यावा, अशी आम्ही विनंती करतो. सूचनेतील इतर मजकूर मात्र जैसे-थे (अबाधित) राहील.

**दिनांक : सप्टेंबर १६, २०२६**
**ठिकाण : मुंबई आणि ठाणे**

**प्राधिकृत अधिकारी**
**आयसीआयसीआय बँक लिमिटेड**

## सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, मे. अशोक लेलँड लिमिटेड यांनी माझ्या नावावर, सविता रतिलाल वधेलवाला (ज्या हयात नाहीत) यांच्यासह जारी केलेले खाली नमूद केलेले शेअर प्रमाणपत्र/प्रमाणपत्रे हरवले/गहाळ झाले आहे/आहेत.

| फोलिओ क्र. | प्रमाणपत्र क्र. | विशिष्ट क्र. | शेअर्सची संख्या |
|---|---|---|---|
| ०००४२८ | ५०००४२८ | ०४४२४९५५७१ - ०४४२४९७१७० | १,६०० |
| ०००४२८ | ०३३७३३ | २६४४४०१९२० - २६४४४०३५१९ | १,६०० |

त्याबाबतची योग्य सूचना कंपनीला देण्यात आली असून, आम्ही डुप्लिकेट शेअर प्रमाणपत्र जारी करण्यासाठी कंपनीकडे अर्ज केला आहे.

उपरोक्त शेअर प्रमाणपत्राची कोणत्याही प्रकारे खरेदी किंवा त्यासंबंधी व्यवहार करण्याविरुद्ध याद्वारे सर्वसामान्य जनतेस सावध करण्यात येते. सदर शेअर प्रमाणपत्राच्या/प्रमाणपत्रांच्या संदर्भात कोणत्याही व्यक्तीचा कोणताही दावा असल्यास, त्यांनी असा दावा मे. अशोक लेलँड लिमिटेड, क्र. १, सरदार पटेल रोड, गिंडी, चेन्नई ६०० ०३२, ईमेल: secretarial@ashokleyland.com येथे किंवा त्यांचे शेअर ट्रान्सफर एजंट्स, इंटिग्रेटेड रजिस्ट्री मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, ''केन्सेस टॉवर्स'', २रा मजला, क्र. १ रामकृष्ण स्ट्रीट, नॉर्थ उस्मान रोड, टी नगर, चेन्नई ६०० ०१७, ईमेल: csdstd@integratedindia.in यांच्याकडे, या सूचनेच्या प्रकाशनापासून १५ दिवसांच्या आत दाखल करावा; अन्यथा कंपनी कोणतीही पुढील सूचना न देता डुप्लिकेट प्रमाणपत्र/प्रमाणपत्रे जारी करण्याची कार्यवाही पुढे करेल.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १६/०९/२०२६

शेअरधारकाचे नाव आणि पत्ता:
नीना रतिलाल वधेलवाला,
पूर्णा ज्योत, वल्लभभाई पटेल रोड,
सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई-४०००५४

### फॉर्म क्र. आयएनसी-१९
### सूचना

(कंपनीज (इन्कॉर्पोरेशन) रूल्स, २०१४ च्या नियम २२ नुसार)

१. सूचना याद्वारे देण्यात येते की, कंपनीज अधिनियम, २०१३ च्या कलम ८(४)(ii) ला अनुसरुन कंपनी अधिनियमाच्या कलम ८ (५) अंतर्गत तिला जारी केलेली परवाना रद्द करून प्रायव्हेट लिमिटेड कडे कलम ८ पासून कंपनीचे रूपांतर करण्यासाठी प्रादेशिक संचालक, पश्चिम क्षेत्र II, मुंबई, महाराष्ट्र यांच्याकडे २५२ एकर्स फाऊंडेशन (''कंपनी'') यांनी अर्ज केला आहे. परवाना रद्द झाल्यानंतर, कंपनीला तिच्या नावामध्ये ''प्रायव्हेट लिमिटेड'' हे शब्द जोडणे आवश्यक असेल.

२. कंपनीची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे: ए) जंगले, देवराई, शेती, नर्सरी यांचा विकास आणि बियाण्यांचे संकलन व साठवणूक, बी) जंगल विकासासाठी संशोधन आणि सल्लागार आणि शेती, जंगले, हरित क्षेत्र यांच्या आर्थिक मूल्याच्या मूल्यांकनासाठी सल्लागार नियुक्ती. सी) वृक्षारोपण मोहिमा राबविणे, वृक्षांची देखभाल आणि काळजी. डी) सोलर, हायड्रो, पवन, जैव-वैद्यकीय कचरा, बायोगॅस यांसारख्या अपारंपारिक उर्जा स्त्रोतांचे संशोधन, विकास आणि वापर. ई) सिंचन, शेती, जंगलेसाठी उत्पादन, उपकरणे, साधने आणि सामान यांचे संशोधन, विकास, वापर आणि वितरण. एफ) जलसंधारण करणे, चेक डॅम्स, बंधारे, जोहड्स, तलाव, तळी आणि इतर जलसंधारण कार्यक्रम तयार करणे, पक्षी, कीटक, वन्य प्राणी, मासे आणि इतर जलचर प्राण्यांसाठी नैसर्गिक अधिवास, जलाशय, खारफुटी यांच्या संवर्धनाशी संबंधित उपक्रम राबविणे. जी) सेमिनार्स, वर्कशॉप्स आयोजित करणे, निसर्ग संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी फिल्म्स बनविणे.

३. प्रस्तावित कंपनीच्या ड्राफ्ट मेमोरँडम आणि आर्टिकल्सची प्रत युनिट क्र. २११, २रा मजला, ओपल स्क्वेअर, एस. जी. बर्वे मार्ग, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे पश्चिम ४००६०४ येथे पाहता येईल.

४. सूचना याद्वारे देण्यात येते की, या अर्जावर आक्षेप घेणारी कोणतीही व्यक्ती, फर्म, कंपनी, कॉर्पोरेशन किंवा निगम मंडळ १००, एव्हरेस्ट बिल्डिंग, मरीन ड्राइव्ह, मुंबई ४००००२ येथे निबंधकांना पत्र लिहुन सदर सूचना प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांत असा आक्षेप मुंबई II येथील प्रबंधकाना कळवू शकते, ज्याची एक प्रत युनिट क्र. २११, २रा मजला, ओपल स्क्वेअर, एस. जी. बर्वे मार्ग, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे पश्चिम ४००६०४ येथे अर्जदारांना पाठविणे आवश्यक आहे.

सदर दिनांक १६ सप्टेंबर २०२६

अर्जदारांचे नाव
**१. अल्हाद ओक, संचालक**
**२. कल्याणी ओक, संचालक**

### महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ७० (ब) अन्वये द्यावयाची नोटीस

१) पास्कोल जुरन मिरांडा (मयत) यांचे वारस व इतर, तर्फे मुखत्यार सिडनी हरमन मिरांडा, पत्ता - हरमन मिरांडा हाऊस, ख्रिश्चन लेन, मढ आईसलॅन्ड, मालाड (प), मुंबई ४०० ०६१
........ **अर्जदार**

**विरुध्द**

१) मणिलाल गंगादास,
२) नागरदास गंगादास,
३) काशिदास गंगादास
पत्ता — पास्कल वाडी, मढ जेट्टी रोड, मढ आईसलॅन्ड, मालाड (प), मुंबई ४०० ०६१
........ **सामने वाले**

१) अनिल गुलाबदास शहा, पत्ता — अन्ना बिल्डींग, १३ वा रोड, तुयास रेस्टॉरेंटजवळ, जुहू, मुंबई ४०० ०४९
२) परेश जयंतीलाल शहा, पत्ता — बी/१०, कृष्णा सोसायटी, जुहू, मुंबई ४०० ०४९
........ **हस्तक्षेपकार**

**जमिनीचे वर्णन - मौजे एरंगळ, ता. बोरीवली**

| भुमापन क्रमांक (स.नं.) | पोट हिस्साक्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. |
|---|---|---|
| ९१ | १/ब | एकूण ला.यो. ०.३८.१९<br>एकूण पो.ख. ०.००.२५<br>एकूण क्षेत्र ०.३८.४४<br>आकारणी — ४.३० |

ज्याअर्थी अर्जदार यांनी वरील नमूद मिळकतीस महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ७० (ब) मधील तरतुदीनुसार कुळ निश्चित करणेकामी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी आता तुम्हांस नियोजीत जमिनी विषयी काही सांगावयाचे असल्यास अथवा हरकत घ्यावयाची असल्यास दि.२२/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसीलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण बोरीवली यांचेपुढे हजर राहण्याविषयी तुम्हांस फर्माविण्यात येत आहे.

तरी सदर दिवशी व वेळी या न्यायाधिकरणापुढे आपण अथवा आपले अधिकृत प्रतिनिधी हजर राहण्यास कसूर कराल तर त्याबाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि आपले गैरहजेरीत आवश्यक त्या चौकशीचे काम पुढे चालू राहील.

क्रमांक :- तह/बोरी/टे-१/टिएनसी/७०(ब)/एसआर- ०४/२०२६
ठिकाण :- बोरीवली
दिनांक :- ०४/०९/२०२६

(संघमित्रा बाविस्कर)
तहसीलदार तथा
शेतजमिन न्यायाधिकरण बोरीवली

### महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ३२ (ग) मधील तरतुदीनुसार कूळ खरेदीदार म्हणून घोषित करणेबाबत कार्यवाही

१) पास्कोल जुरन मिरांडा (मयत) यांचे वारस व इतर, तर्फे मुखत्यार सिडनी हरमन मिरांडा, पत्ता - हरमन मिरांडा हाऊस, ख्रिश्चन लेन, मढ आईसलॅन्ड, मालाड (प), मुंबई ४०० ०६१
........ **अर्जदार**

**विरुध्द**

१) मणिलाल गंगादास,
२) नागरदास गंगादास,
३) काशिदास गंगादास
पत्ता — पास्कल वाडी, मढ जेट्टी रोड, मढ आईसलॅन्ड, मालाड (प), मुंबई ४०० ०६१
........ **सामने वाले**

१) अनिल गुलाबदास शहा, पत्ता — अन्ना बिल्डींग, १३ वा रोड, तुयास रेस्टॉरेंटजवळ, जुहू, मुंबई ४०० ०४९
२) परेश जयंतीलाल शहा, पत्ता — बी/१०, कृष्णा सोसायटी, जुहू, मुंबई ४०० ०४९
........ **हस्तक्षेपकार**

**जमिनीचे वर्णन - मौजे एरंगळ, ता. बोरीवली**

| भुमापन क्रमांक (स.नं.) | पोट हिस्साक्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. |
|---|---|---|
| ९६ | १/क | एकूण ला.यो. ०.०५.०६<br>पो.ख. ०.०२.२८<br>एकूण क्षेत्र ०.०७.३४<br>आकारणी — ०.३९ |

ज्याअर्थी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ याच्या कलम ३२ अन्वये प्रत्येक कुळाने कलम ३२ यात दिलेल्या शर्तीस अधीन राहून, त्याने कूळ म्हणून धारण केलेली जमीन खरेदी केलेली आहे, असे समजण्यात येते, आणि ज्याअर्थी, ती जमीन खरेदी करण्याची कुळाची इच्छा आहे किंवा कसे हे कलम ३२-ग पोटकलम (३) व (४) याद्वारे निश्चित करणे व त्याची तशी इच्छा असल्यास, जमिनीची खरेदी किंमत ठरविणे हे न्यायाधिकरणास भाग आहे.

त्याअर्थी आता तुम्हांस नियोजीत जमीन खरेदी करणे विषयी काही सांगावयाचे असल्यास अथवा हरकत घ्यावयाची असल्यास दि.२२/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसीलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण बोरीवली यांचेपुढे हजर राहण्याविषयी तुम्हांस फर्माविण्यात येत आहे.

तरी सदर दिवशी व वेळी या न्यायाधिकरणापुढे आपण अथवा आपले अधिकृत प्रतिनिधी हजर राहण्यास कसूर कराल तर त्याबाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि आपले गैरहजेरीत आवश्यक त्या चौकशीचे काम पुढे चालू राहील.

क्रमांक :- तह/बोरी/टे-१/टिएनसी/३२(ग)/एसआर- ०८/२०२६
ठिकाण :- बोरीवली
दिनांक :- ०४/०९/२०२६

(संघमित्रा बाविस्कर)
तहसीलदार तथा
शेतजमिन न्यायाधिकरण बोरीवली

सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India

[See Rule 8 (1)] SARFAESI Rule
### ताबा नोटीस
(For Immovable Property)

**क्षेत्रिय कार्यालय, नाशिक**: पी-६३, सातपुर MIDC, नाशिक-४२२००७

ज्याअर्थी,

खालील सही करणार **सेंट्रल बँक ऑफ इंडिया, नंदुरबार शाखा** चे अधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट २००२ कायदा आणि कलम १३(२) आणि कलम १३(१२) अन्वये नियम ३ सह वाचता प्राप्त अधिकाराचा वापर करून सिक्युरिटी इंटरेस्टच्या (एन्फोर्समेंट) नियम २००२ नुसार **दि.१५/०६/२०२६** ला **मागणी सूचना** केली होती. **कर्जदार श्री. राहुल शिवदास सकट** यांना कर्जाची रक्कम **रू. ६,६२,८४५.१९ (अक्षरी रू. सहा लाख बासष्ट हजार आठशे पंचेचाळीस व पैसे एकोणावीस फक्त) + त्यावरील व्याज व शुल्क** असे मागणी नोटीस दिल्याचे तारखेपासून ६० दिवसांचे आत भरण्यास सांगितले होते.

कर्जदार हे वरील संपूर्ण रक्कम परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने कर्जदार, जामिनदार आणि तमाम जनतेला सदरच्या नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, खालील सही करणार अधिकृत अधिकारी यांनी कायद्याच्या कलम १३(४) आणि नियम ८ च्या अंतर्गत त्याला/तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सिक्युरिटी इंटरेस्टच्या (एन्फोर्समेंट) नियम २००२ नुसार खालील नमूद मालमत्तेचा ताबा **९ सप्टेंबर २०२६** रोजी घेतला आहे.

कर्जदार/जामिनदार आणि तमाम जनतेला सूचित करण्यात येते की, खालील मालमत्तेबाबत कोणीही व्यवहार करू नयेत. केल्यास ते वरील थकीत रक्कम **रू. ६,६२,८४५.१९ (अक्षरी रू. सहा लाख बासष्ट हजार आठशे पंचेचाळीस व पैसे एकोणावीस फक्त) + त्यावरील व्याज व शुल्कासह** असे **सेंट्रल बँक ऑफ इंडिया** यांना देण्यास बांधील राहतील.

सुरक्षित मालमत्तेची पुर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात, सरफेसी कायद्याच्या कलम १३च्या उप-कलम (८) च्या तरतुदीकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात आले आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

जयरामनगर, वाघोडा, नंदुरबार, तालुका व जिल्हा नंदुरबार येथील प्लॉट क्र.१७९, सर्व्हे नं. ६/१, मोजमापीत क्षेत्र ८४ स्क्वे.मी. असलेली ती संपूर्ण मालमत्ता व तिचा भाग व पार्सल. **मालक : श्री. राहुल शिवदास सकट** यांच्या मालकीची.

**चतु:सीमा खालीलप्रमाणे-**

**पुर्वेस-** कॉलनी रोड, **पश्चिमेस-** कॉलनी रोड, **दक्षिणेस-** प्लॉट नं.१८०, **उत्तरेस-** मोकळी जागा.

**दिनांक : ०९.०९.२०२६**
**ठिकाण : नाशिक**

टिप: स्वैर भाषांतर, तफावत असल्यास इंग्रजी ग्राह्य.

**सही/-**
**अधिकृत अधिकारी**
**सेंट्रल बँक ऑफ इंडिया**